# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## महायुतीची एकजूट विकासासाठी आवश्यक : आ. राणादादा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मार्च -**

जिल्ह्यात भाजप सर्वात मोठा पक्ष असतानाही मित्रपक्षांना सोबत घेण्याचा शब्द पाळत महायुतीची एकजूट राखण्यात यश आल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली ही एकजूट जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्हा परिषद नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करताना त्यांनी सांगितले की, जनतेने दिलेल्या विश्वासाला न्याय देण्यासाठी पूर्णवेळ काम करणे गरजेचे आहे.



राज्यातील महायुती सरकारकडून जिल्ह्याला मोठा निधी मिळत असून विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ग्रामीण भागातील समस्या सोडवण्यासाठी सत्तेचा सकारात्मक वापर करण्याचे आवाहन करत, कोणतीही अडचण आल्यास आपण पाठीशी उभे राहू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

स्थानिक निवडणुकांत मतदारांनी विकासाला कौल देत महायुतीची ताकद पुन्हा सिद्ध केल्याचे त्यांनी सांगितले.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### तेग सुडो स्पर्धेत प्रणिता सूर्यवंशीला कांस्यपदक

**उमरगा, दि.२८ मार्च -**

येथे आयोजित राज्यस्तरीय तेग सुडो क्रीडा स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या ४० किलो वजन गटात कुमारी प्रणिता सूर्यवंशी हिने उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला. तिच्या या यशामुळे शाळा व परिसराचे नाव उज्ज्वल झाले आहे. या यशाबद्दल शाळेत तिचा सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक नेताजी गायकवाड तसेच क्रीडा शिक्षक संजय कोथळीकर यांच्या हस्ते प्रणिताचा गौरव करण्यात आला. तिच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. चंद्रकांतराव महाजन, संस्था अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दांडगे आणि कार्यवाह डॉ. कपिल महाजन यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### रमेश माने यांची कार्यवाहकपदी निवड

**धाराशिव, दि.२८ मार्च -**



महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विस्तारित राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत दीर्घकाळ सक्रिय योगदान लक्षात घेऊन धाराशिव येथील रमेश दौलतराव माने यांची डॉ. नरेंद्र दाभोळकर लोक विद्यापीठाच्या कार्यवाहक पदी सर्वानुमते निवड करण्यात आली. सातारा येथील श्रीलीला रिसॉर्ट, यवतेश्वर (कास पठार) येथे ही दोन दिवसीय बैठक उत्साहात पार पडली. राज्यातील २६ जिल्ह्यांमधून ३०० पेक्षा अधिक कार्यकर्त्यांनी या बैठकीस उपस्थिती दर्शवली. धाराशिव जिल्ह्यातून चंद्रकांत उळेकर व रमेश माने यांनी सहभाग घेतला. रमेश माने यांच्या या निवडीबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून अंनिसचे कार्यकर्ते व मान्यवरांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

### डॉ. दिनेश मोळगड्डे यांना डीएम न्यूरोलॉजीसाठी प्रवेश

**अणदूर, दि.२८ मार्च -**



अणदूर येथील श्री खंडोबा पणन सहकारी संस्थेचे व्यवस्थापक दिगंबर मोळगड्डे यांचे सुपुत्र डॉ. दिनेश मोळगड्डे यांना मुंबईतील नायर हॉस्पिटलमध्ये डीएम न्यूरोलॉजी (मेंदू रोग तज्ज्ञ) या उच्च पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला आहे. महाराष्ट्रात केवळ चार जागांपैकी एक जागा त्यांनी मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ग्रामीण भागातून शिक्षण घेत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी हे यश मिळवले. लातूर येथे एमबीबीएस आणि कोलकत्ता येथील नॅशनल मेडिकल कॉलेजमध्ये एमडी पूर्ण करून त्यांनी पुढील शैक्षणिक वाटचाल यशस्वीपणे सुरू ठेवली. या यशाबद्दल विविध मान्यवर व संस्थांकडून त्यांचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.



### जव्हेरिया शेखला ऑलिम्पियाडमध्ये गोल्ड मेडल

**तुळजापूर, दि.२८ मार्च -**

शहरातील तुळजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमधील इयत्ता पहिलीतील विद्यार्थिनी जव्हेरिया जुबेर शेख हिने लहान वयातच उल्लेखनीय यश संपादन करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. ऑलिम्पियाड परीक्षेतील गणित विषयात तिने ९७.९८ टक्के गुण मिळवत गोल्ड मेडल पटकावले आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेच्या वतीने तिचा विशेष सत्कार करण्यात आला. प्राचार्या लोद व राजेश जगताप यांच्या हस्ते तिला गोल्ड मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. लहान वयातच गणित विषयात दाखवलेली तिची प्रावीण्य व मेहनत कौतुकास्पद असल्याचे शिक्षकांनी सांगितले असून, तिच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

### अश्विनीताई कोंडो यांची निवड

**तुळजापूर, दि.२८ मार्च -**

राष्ट्रीय स्तरावर आयोजित गीता परिवाराच्या सहस्त्र गीता कंठनाद या भव्य आध्यात्मिक सोहळ्यासाठी गीता परिवाराच्या प्रमुख भागवताचार्य अश्विनी कोंडो या रवाना झाल्या आहेत. विशेष म्हणजे, या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या धाराशिव जिल्ह्यातील त्या एकमेव महिला प्रतिनिधी ठरल्या आहेत. कुरुक्षेत्र येथे होणाऱ्या या कार्यक्रमासाठी देशभरातून निवडक १००१ गीता प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले आहे. या प्रतिष्ठित सोहळ्यात सहभागी होण्याचा मान मिळणे हे मोठे गौरवाचे मानले जात असून कोंडो यांच्या निवडीमुळे तुळजापूरसह संपूर्ण जिल्ह्याचा सन्मान उंचावला आहे. या सोहळ्यास गीता परिवाराचे संस्थापक अध्यक्ष परमपूज्य स्वामी गोविंदगिरी महाराज, योगगुरू बाबा रामदेव तसेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# श्री तुळजाभवानी चैत्रोत्सवासाठी मंदिर २२ तास खुले!

## ▶▶ सलग सुट्यांमुळे भाविकांची तोबा गर्दी... ▶▶ रविवारी व्हीआयपी दर्शन बंद...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ मार्च -**

साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या तुळजापूरच्या श्री तुळजाभवानी देवीच्या चैत्री पौर्णिमा उत्सवासाठी मंदिर प्रशासन सज्ज झाले असून, भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता मंदिर दररोज २२ तास खुले ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा उत्सव ३० मार्च ते ३ एप्रिल दरम्यान साजरा होणार आहे.

मंदिराचे दरवाजे दररोज रात्री १ वाजता उघडून रात्री ११ वाजता बंद केले जाणार असून, केवळ दोन तासांच्या विश्रांतीनंतर पुन्हा दर्शनासाठी खुले राहणार आहे. त्यामुळे अधिकाधिक भाविकांना दर्शन घेता येणार आहे. मंदिर व्यवस्थापक तथा तहसीलदार माया माने यांनी ही माहिती दिली.

चैत्रोत्सव काळात तुळजापूर येथे मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होत असल्याने रांग व्यवस्थापनासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. भाविकांना बिडकर पायरीमार्गे दर्शन मंडपात सोडण्यात येणार आहे. वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर मंदिर संस्थानकडून विशेष सोयी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सुवर्णेश्वर गणपती ते महाद्वार चौकापर्यंत भव्य मंडप उभारण्यात येणार असून, भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

गुढीपाडवा आणि त्यानंतरच्या सलग सुट्ट्यांमुळे तुळजापूर येथे मोठी गर्दी झाली होती. व्हीआयपी दर्शनामुळे सर्वसामान्य भाविकांना उशीर होत असल्याच्या तक्रारी वाढल्याने शनिवार व रविवारी व्हीआयपी दर्शन बंद ठेवण्याचा निर्णय मंदिर समितीने घेतला आहे. तासनतास रांगेत थांबूनही समाधानकारक दर्शन मिळत नसल्याची



भावना भाविकांमध्ये असून, रांग व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याची मागणी पुढे येत आहे.

## रस्ता तात्काळ खुला करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मार्च -**

पंचायत समिती परिसरातून समता नगरकडे जाणारा महत्त्वाचा रस्ता तात्काळ खुला करावा, अन्यथा आडवे टाकलेले सिमेंट पोल उखडून टाकण्याचा इशारा शिवसेना (उबाठा ) पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.

नगर परिषद हद्दीतील सर्व्हे क्रमांक १४५ मधून जिल्हाधिकारी कार्यालय ते समता कॉलनीला जोडणारा १२ मीटर रुंदीचा हा रस्ता पंचायत समितीच्या क्वार्टरसमोरून जातो. गेल्या सुमारे ५० वर्षांपासून नागरिक या मार्गाचा वापर करत असून, दवाखाने, शासकीय कार्यालये व बँकांकडे जाण्यासाठी हा रस्ता सोयीचा ठरत होता.

दरम्यान, शासनाच्या मंजूर विकास योजनेत या रस्त्याला १२ मीटर डी.पी. रोडचा दर्जा देण्यात आला आहे. मात्र पंचायत समितीने समता कॉलनीच्या बाजूने सिमेंट पोल टाकून रस्ता बंद केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यामुळे नागरिकांच्या वहिवाटीला अडथळा निर्माण झाला असून, हा प्रकार नगररचना कायद्याचे उल्लंघन असल्याचा दावा शिवसेनेने केला आहे.

## कांदा उत्पादकांना प्रति क्विंटल १००० रुपये अनुदान द्या

### डॉ. प्रतापसिंह पाटील यांची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मार्च -**



राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत असून त्यांना तात्काळ दिलासा देण्यासाठी प्रति क्विंटल १००० रुपये अनुदान देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना निवेदन सादर केले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, कांदा लागवडीसाठी लागणारे बियाणे, खते, कीडनाशके, मजुरी तसेच इतर शेतीसंबंधित खर्चात मोठी वाढ झाली आहे. मात्र बाजारपेठेत कांद्याला अत्यल्प दर मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही परत मिळत नाही. परिणामी अनेक शेतकरी कर्जबाजारी होत असून त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर गंभीर परिणाम होत आहे.



डॉ. पाटील यांनी सांगितले की, राज्यातील शेतकऱ्यांची ही बिकट परिस्थिती लक्षात घेता शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. विशेषतः कांदा उत्पादकांना प्रति क्विंटल १००० रुपये अनुदान दिल्यास त्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळू शकतो.

तसेच शासनाने या निवेदनाची तातडीने दखल घेऊन शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घ्यावा, अशी नम्र विनंतीही त्यांनी केली आहे.

राज्यातील हजारो कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष आता शासनाच्या निर्णयाकडे लागले आहे.

## जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकरीपदी म्हाडदळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मार्च -**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांची बदली होऊन त्यांची सांगली जिल्ह्याच्या जिल्हाधिकारीपदी पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या जागी आयएएस अधिकारी प्रियंवदा अशोक म्हाडदळकर या धाराशिव जिल्हा परिषदेच्या नव्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारणार आहेत.

राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने शुक्रवारी उशिरा यासंदर्भातील आदेश जारी केले. सांगलीचे विद्यमान जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या जागी डॉ. घोष पदभार स्वीकारणार आहेत. डॉ. घोष यांनी फेब्रुवारी २०२४ मध्ये धाराशिव जिल्हा परिषदेच्या उएज पदाची सूत्रे स्वीकारली होती. त्यांच्या कार्यकाळात विविध विकासकामांना गती मिळाली.



रत्नागिरी जिल्ह्यातील मूळ असलेल्या म्हाडदळकर यांचे शिक्षण मुंबई येथे झाले. त्यांनी व्हीजेटीआयमधून इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी पदवी तसेच आयआयएम बंगलोरमधून एमबीए पूर्ण केले आहे. प्रशासकीय सेवेत येण्यापूर्वी त्यांनी ड्यूश बँकेत काम केले असून सार्वजनिक सेवेसाठी त्यांनी नोकरी सोडून युपीएससीची तयारी केली.

परिविक्षाधीन कालावधीत त्यांनी तुळजापूर नगरपालिका तसेच आदिवासी विकास विभागात काम केले असून उमरगा येथे उपविभागीय अधिकारी (प्रशिक्षणार्थी) म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे.

## धाराशिव-छत्रपती संभाजीनगर नवीन रेल्वे मार्गाबाबत बैठक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मार्च -**

भारत सरकारच्या विकास धोरणानुसार प्रस्तावित धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या महत्त्वाकांक्षी नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पाला गती मिळत असून, यासंदर्भात २७ मार्च रोजी बीड येथे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. या बैठकीस रेल्वे विभागाचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रतिनिधी तसेच इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. प्रस्तावित रेल्वे मार्गाच्या सर्व्हे कामाबाबत आणि विविध तांत्रिक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



प्रस्तावित रेल्वे मार्गामुळे धाराशिव, बीड आणि छत्रपती संभाजीनगर या भागांतील नागरिकांना जलद, सुरक्षित आणि सुलभ प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच औद्योगिक व व्यावसायिक कनेक्टिव्हिटी वाढून स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. ग्रामीण व शहरी भागांतील संपर्क सुधारल्यामुळे शिक्षण, आरोग्य आणि इतर मूलभूत सुविधांपर्यंत पोहोच अधिक सुलभ होणार आहे.

यावेळी जिल्हाधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे विभाग आणि संबंधित यंत्रणांनी संयुक्त पथक स्थापन करून प्रस्तावित रेल्वे मार्गाचा सर्व्हे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. हा रेल्वे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मराठवाड्यातील दळणवळण व्यवस्थेला नवे बळ मिळून प्रादेशिक विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## वाशी तालुक्यात गाड्या अडवून दोन लाखांची मागणी; चालकाला मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२८ मार्च -**

वाशी तालुक्यातील खानापूर-नांदगाव रस्त्यावर दि.२६ मार्च रोजी दुपारी पवनचक्की प्रकल्पासाठी साहित्य वाहतूक करणाऱ्या गाड्या काही व्यक्तींनी अडवून पैशांची मागणी केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी वाशी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

फिर्यादी दत्तात्रय शिवाजी माने (वय ४१), व्यवसायाने ठेकेदार, यांनी दिलेल्या तक्रारीनुसार संबंधित वाहन रस्त्यात अडवून वाद घालण्यात आला. गाडी पुढे जाऊ देण्यासाठी सुमारे दोन लाख रुपयांची मागणी करण्यात आल्याचा आरोप आहे. यावेळी चालकास शिवीगाळ करून मारहाण केल्याचाही आरोप फिर्यादीने केला आहे. दरम्यान, संबंधित भागात टाटा पावरच्या पवनचक्की प्रकल्पाची कामे सुरू असून, त्या अनुषंगाने जाणाऱ्या वाहनांना अडवून पैशांची मागणी केल्याचे प्रकार घडत असल्याची चर्चा स्थानिक स्तरावर सुरू आहे.

या प्रकरणी काही व्यक्तींविरुद्ध तक्रार नोंदविण्यात आली असून वाशी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## आदर्श प्राथमिक विद्यामंदिरात पालक मेळाव्यास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मार्च -**

आदर्श प्राथमिक विद्यामंदिर, धाराशिव येथे दि.२८ मार्च २०२६ रोजी इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यास पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापकांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी मेळाव्याचे उद्दिष्ट स्पष्ट करत शाळा व पालक यांच्यातील संवादाचे महत्त्व अधोरेखित केले.

वर्गशिक्षक वैभव चव्हाण यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यास, शिस्त व वर्तनाविषयी पालकांशी संवाद साधत आवश्यक सूचना




दिल्या. यावेळी पालकांनीही आपले अभिप्राय व सूचना मांडल्या.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक के.बी. घोडके, उपमुख्याध्यापक बी.के. कुंभार यांनी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा व पालक यांचा समन्वय अत्यावश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव धनंजय आप्पा पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पालक व शिक्षकांनी एकत्रित प्रयत्न करून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी कार्य करावे, असे आवाहन केले.

## नळदुर्ग पोलिसांची धडाकेबाज कारवाई; ४६.१२ लाखांचा गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२८ मार्च -**

सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावर नळदुर्ग पोलिसांनी २७ मार्च रोजी धाडसी कारवाई करत ३३ लाख १२ हजार रुपयांचा गुटखा व वाहनांसह एकूण ४६ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास ११२ क्रमांकावर अज्ञात व्यक्तीकडून माहिती मिळाली की, कर्नाटकातून नळदुर्ग मार्गे बीडकडे आयशर वाहनातून गुटखा वाहतूक होत आहे.

ही माहिती मिळताच परीसहाय्यक पोलिस अधीक्षक मेघना आय. एन. यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके, पोलिस उपनिरीक्षक ईश्वर नागरे यांच्यासह पथकाने सोलापूर-हैदराबाद महामार्गावर सापळा रचला.

उमरग्याकडून नळदुर्गकडे येत असलेले आयशर (क्र. एमएच १६ सीडी २३९५) वाहन मुर्टा पाटी जवळील मैलारपूर तांडा शिवारात संशयावरून थांबवून तपासणी करण्यात आली. यावेळी वाहनात मोठ्या प्रमाणात गुटखा आढळून आला.

जप्त गुटख्याची किंमत ३३ लाख १२ हजार रुपये इतकी आहे. या कारवाईत पोलिसांनी आयशर वाहनासह एक स्विफ्ट कारही जप्त केली असून एकूण ४६ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

या प्रकरणी संजय सुभाष जगताप (वय ३२), सतीश तुकाराम सोनटक्के (वय २८) आणि सचिन परमेश्वर पवार (वय २८, रा. वानेवाडी, ता. पाटोदा, जि. बीड) यांना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात हा गुटखा कर्नाटकातून बीडकडे जात असल्याचे समोर आले आहे.

परीसहाय्यक पोलिस अधीक्षक मेघना आय.एन. यांच्या मार्गदर्शनाखाली नळदुर्ग पोलिसांकडून सुरू असलेल्या धडाकेबाज कारवायांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## 'शेतकरी संघर्ष न्याय यात्रा' ३० मार्चला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मार्च -**

शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने ३० मार्च रोजी 'शेतकरी संघर्ष न्याय यात्रा' आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष धीरज पाटील व नगरसेवक अमोल कुतवळ यांनी दिली.

ही यात्रा तुळजापूर तालुक्यातील सुरतगावातून सुरू होऊन तुळजापूर शहरापर्यंत सुमारे १७ किमी अंतर पार करणार आहे.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली ही यात्रा संपन्न होणार आहे.

यात्रेत भूसंपादन मोबदला, पीकविमा, कर्जमाफी, वीजपुरवठा, स्मार्ट मीटर रद्द करणे, कांद्याला हमीभाव यांसह विविध मागण्या मांडल्या जाणार आहेत.

यात्रेचा समारोप तुळजापूर येथे सायंकाळी ५ वाजता होणार असून, त्यावेळी मार्गदर्शनपर सभा आयोजित करण्यात आली आहे.